**पदवीधर/पदविका/अर्हतारहित कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)यांना राजपत्रित अधिकारी गट ब (कनिष्ठ स्तर) दर्जा लागु करणे बाबत.
श्रीम.नागपुरे रेश्मा नारायण,कनिष्ठ अभियंता**

## जिल्हा परिषद अहिल्यानगर
**आदेश जा.क्र.ग्रापापु/आस्था-३/३८८/२०२५
अहिल्यानगर दि.२४/१२/२०२५**

संदर्भ :- १.शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्र.झेडएनजी/१४८४/प्र.क्र.२६३९/११२ दि.९ जून १९८६.
२.शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्र.झेडएनजी/१०८६/सीआर-२९८६/११ दि.११ मार्च १९८७.
३. शासन निर्णय ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.झेडएनजी/१०००/ प्र.क्र.२ ६४/११ दि.२६ एप्रिल २००१
४. वित्त विभाग शासन निर्णय वेपूर-११२५/प्र.क्र.०१/सेवा-९ दि.०२ जुन २०२५
५.सा.बां.उत्तर विभागाकडील आदेश जा.क्र.सा.बां./आस्था-२/६७३/२०२५ दि.२४/११/२०२५
६.गठीत पदोन्नती समितीचे मंजुर इतिवृत्त दि.१.१२.२०२५

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडिल उक्त संदर्भीय शासन निर्णय क्र.३ वरील शासन निर्णय दिनांक २६ एप्रिल २००१ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर जिल्हा परिषद सेवेमध्ये असलेले कनिष्ठ अभियंता जे पदवीधारक/पदविका/अर्हतारहीत आहेत, त्यांना तात्पुरते राजपत्रित अधिकारी, गट -ब (कनिष्ठस्तर)शाखा अभियंता पदाचा दर्जा नांवासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून देण्यात येत आहे.

खालील कनिष्ठ अभियंत्यांना राजपत्रित अधिकारी, गट ब (कनिष्ठ स्तर)शाखा अभियंता पदाचा दर्जा देण्यात येत आहे.परंतु कनिष्ठ अभियंत्यांना नियुक्ती महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा (सेवाप्रवेश)नियम १९६७ प्रमाणे झालेली असल्याने आणि राजपत्रित अधिकारी गट-ब (कनिष्ठ स्तर),शाखा अभियंता हे महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतील राजपत्रित अधिका-यांच्या व्याख्येत समाविष्ट होत नसल्याने त्यांना राजपत्रित अधिकारी म्हणून संबोधता येणार नाही.थोडक्यात ते जिल्हा परिषदेच्या आस्थापनेवरील जिल्हा परिषदेचे कर्मचारी असल्यामुळे त्यांना राजपत्रित अधिकारी म्हणून घोषित करणे शक्य नाही.म्हणून त्यांना केवळ राजपत्रित दर्जा देण्यात येत आहे.संदर्भ क्र.५ अन्वये श्रीम.नागपुरे आर.एन.,कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना दि.१५/०४/२०१५ पासुन वेतनश्रेणी रु.९३००-३४८००(ग्रेड पे-४३००) सह मानीव दिनांक मंजुर करण्यात आलेला आहे

| अ.क्र | कनिष्ठ अभियंताचे नांव | कार्यालयाचे नांव | कनिष्ठ अभियंता पदावर हजर दिनांक | शैक्षणिक पात्रता | राजपत्रित अधिकारी गट -ब (कनिष्ठ स्तर) | राजपत्रित अधिकारी गट-ब (कनिष्ठ स्तर) शाखा अभियंता पदाचा दर्जा लागु करण्यात आलेला दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्रीम.नागपुरे रेश्मा नारायण, कनिष्ठ अभियंता वेतन- १५ : ४१८००-१३२३०० | जि.प.ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग , श्रीरामपूर | दिनांक १५/४/२०१५ (मानीव दिनांक) | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक कोर्स | शाखा अभियंता श्रेणी-२ (अराजपत्रित गट-ब) | दि.१५/४/२०२२ |

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त कनिष्ठ अभियंता यांना राजपत्रित अधिकारी गट -ब (कनिष्ठ स्तर) शाखा अभियंता पदाचा दर्जा लागू करणे ही बाब पदोन्नती नाही परंतु शाखा अभियंता पदाचा दर्जा लागु केल्याचे दिनांकापासून वेतनश्रेणी एस-१६ मध्ये: ४४९००-१४२४०० लागू होईल.आणि त्यांची वेतन निश्चीती उक्त संदर्भ क्र.०३ मध्ये नमुद केले नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम १५ अन्वये करण्यात यावी.संबंधीतांची वेतननिश्चीती करतांना वेतनवाढ अनुज्ञेय नाही.शाखा अभियंता यांचे वेतन व भत्ते अराजपत्रित कर्मचा-यांसाठी विहित केलेल्या देयकाच्या नमुन्यावर काढण्यात यावे.वेतननिश्चीतीमुळे येणा-या फरकाची रक्कम संबंधीतास अदा करण्यात यावी.याबाबत येणारा खर्च संबंधीतांचे वेतन व भत्ते ज्या लेखा शिर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात त्याच लेखा शिर्षामधुन खर्ची टाकण्यात यावा व उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश जिल्हा परिषद अहिल्यानगर यांच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा सांकेतांक 202512241400228..असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 24-12-2025 11:23:18

(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्रीम.नागपुरे रेश्मा नारायण,कनिष्ठ अभियंता, जि.प.ग्रा.पा.पु.उपविभाग, श्रीरामपुर
व्दारा-व प्रतः- उपअभियंता जि.प.ग्रा.पा.पु.उपविभाग श्रीरामपूर

प्रत- कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,जि.प.अहिल्यानगर

प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी,भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

Scanned with OKEN Scanner